01·09·21

रोजी

आज दि. 01·09·21, तक्रार निवारण व शिस्तपालन समितीची meeting 3·00 वाजता सांख्यिकी विभाग प्रमुख डॉ संध्या धावे यांच्या कक्षात घेण्यात आली त्यात सर्वानुमते डॉ विजया संगावार, भौतिकशास्त्र विभाग शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती यांचेकडून नताशा रामटेके हिने केलेल्या तक्रारीबाबत खुलासा मागवण्यात यावा असे ठरले.

त्यानुसार संचालकांच्या संमतीने, त्यांच्या द्वारा डॉ संगावार यांना पाठवण्यासाठी पत्र तयार करण्यात आले.

या सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

1. डॉ संध्या धावे - अध्यक्ष SDDhabe
2. डॉ सी पी चौधरी - सदस्य [signature]
3. डॉ माधवी मार्डीकर - सदस्य - [signature] 1/9/21
4. डॉ जनबंधु - सदस्य [signature]
5. डॉ शोरव रहीम - सदस्य [signature]

09.10.21

आज दि. 09.10.21 रोजी तक्रार निवारण व शिस्तपालन समितीची बैठक 1 वाजता (दुपारी) सांख्यिकी विभागात घेण्यात आली. त्यात दि. 5.10.21 रोजी डॉ विजया संगावार यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रावर चर्चा करण्यात आली व कु नताशा रामटेके ~~[illegible]~~ त्यांना संस्थेत बोलावून खुलासा करण्यास सांगावे असे ठरले. त्यानुसार तीच्याशी मोबाईल वर संपर्क साधून तीच्या सोईनुसार समितीसमोर बोलवण्यात यावे असे ठरले.

1) डॉ संध्या धाबे — Sdhabe
2) डॉ सी पी चौधरी — [signature]
3) डॉ माधवी मार्डीकर — [signature] 9.10.21
4) डॉ जनबंधू — [signature]
5) डॉ स्वाती देशमुख — [signature]
6) डॉ शेख रहीम — [signature] 9/10/21

Scanned with OKEN Scanner

25.07.23

Minutes of Meeting

आज दि. 25.07.23 रोजी तक्रार निवारण व शिस्तपालन समितीची बैठक दुपारी 2 वाजता सांख्यिकी विभागात घेण्यात आली. त्यात कु. नताशा रामटेके हिच्या केसबाबतचा final draft बनवण्यात आला.

तसेच श्री चैतन्य चिं. कोह्पारे यांच्या तक्रारीबाबत चर्चा करण्यात आली व त्याला त्याची फी परत करण्यात यावी असे समितीला वाटते. तसे पत्र तयार करण्यात आले व मा. संचालकांकडे पुढील कारवाईसाठी पाठवले.

या सभेसाठी खालील सदस्य उपस्थित होते.

1. डॉ संध्या धाबे Sdhabe
2. डॉ सी पी चौधरी [signature]
3. डॉ माधवी मार्डीकर [signature]
4. डॉ ज्ञानबंधु [signature]
5. डॉ स्वाती देशमुख [signature]

Scanned with OKEN Scanner

मा. संचालक
शासकीय विज्ञान संस्था,
नागपूर

विषय : श्री चैतन्य चिं. कोहपरे (मो. नं 735013943) यांच्या तक्रारीबाबत

संदर्भ : कार्यालयाकडून प्राप्त झालेले पत्र क्र. 573, दि - 15.05.2023.

आ. महोदय

वरील विषयाचे अनुषंगाने, श्री चैतन्य चिं कोहपरे या विद्यार्थ्याने M.Sc. (Botany) चा प्रवेश ~~दि. ऑगस्ट २०२२~~ रद्द केला होता. (Transaction id : U77RSNAG dt. Aug 19, 2022) परंतु त्याला प्रवेश फी रु. 4299/- अद्यापही मिळाली नाही. याबाबत तक्रार समितीला तक्रार प्राप्त झाली.

UGC circular D.O.No.2-71/2022 [CPP-II] dated 1.11.2022 नुसार संबंधितास प्रवेश रद्द केल्यानंतर पूर्ण प्रवेश फी देय आहे.

धन्यवाद

आपली विश्वासू
SMDhabe
[डॉ संध्या धाबे]
अध्यक्ष - तक्रार निवारण समिती.

1. डॉ सी. पी. चौधरी - सदस्य - [signature]
2. डॉ जनबंधू - सदस्य - [signature]
3. डॉ माधवी मार्डीकर - सदस्य -
4. डॉ स्वाती देशमुख - सदस्य -

Scanned with OKEN Scanner

Sent through dak book
on 07.08.23

प्रती ,

संचालक,

शासकीय विज्ञान संस्था
रवींद्रनाथटागोर मार्ग, सिव्हिल लाइन्स नागपूर

**विषय : कुमारी नताशा रामटेके यांच्या डॉक्टर विजया सांगावार,प्राध्यापक पदार्थ विज्ञान यांनी दिलेल्या धमकी विरुद्ध केलेल्या तक्रारीबाबत**

**संदर्भ : संचालक,उच्च शिक्षण ,महाराष्ट्र राज्य ,यांचे पत्र क्रमांक म म अ /२०२१/६०३०/वि सं ना /प्रशा - १/ ९५६९ दिनांक ३०/०८/२१**

वरील संदर्भित विषयानुसार,या case मध्ये आतापर्यंत झालेल्या सर्व पत्रव्यवहाराचा आढावा खालील प्रमाणे आहे.

१ कुमारी नताशा रामटेके यांचे पहिले पत्र दिनांक ३०/०८/२१ रोजी तक्रार निवारण समितीला संस्थेच्या कार्यालयाकडून प्राप्त झाले .त्यात अर्जदाराने डॉक्टर विजया सांगावार,प्राध्यापक पदार्थ विज्ञान यांच्याविरद्ध प्रात्यक्षिक परीक्षे तील गुणांबाबत तक्रार केली होती.

2 तक्रार निवारण समितीची बैठक घेण्यात आली व मधल्या कालावधीत डॉक्टर विजया सांगावार यांची बदली शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञानसंस्था अमरावती येथे झाली होती त्यामुळे दिनांक ०३/०९/२०२१ रोजी डॉक्टर विजया सांगावार,प्राध्यापक पदार्थ शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञानसंस्था, याना सगळी आवश्यक ती कागदपत्रे जोडून , पोस्टा मार्फत पत्र पाठवण्यात आले.व त्याचे याबाबत काय म्हणणे आहे याची विचारणा करण्यात आली

3 परंतु त्यावर डॉक्टर विजया सांगावार यांचेकडून काहीच उत्तर आले नाही .त्यामुळे त्यांना एक स्मरण पत्र पोस्टा मार्फत पाठवले व ई-मेल देखील करण्यात आले .

4 त्यावर डॉक्टर विजया सांगावार यांचे उत्तर दिनांक ०५/०१०/२१ रोजी प्राप्त झाले .त्यात त्यांनी कुमारी नताशा रामटेके हिच्या प्रात्यक्षिक परीक्षे तील गुणांशी माझा काही संबंध नाही असे सांगितले व मी कोणतीही धमकी दिली नव्हती असे सांगितले.

07/08/2023

संस्था विज्ञान संस्था
नागपूर

Scanned with OKEN Scanner

5 त्यानंतर कुमारी नताशा रामटेके याना संस्थेत बोलावून त्यांनी याबाबत खुलासा करावा यासाठी त्यांना ८५५२८५८१११ या भ्रमणध्वनी क्रमांकावर व्हाट्सअॅप वर message करण्यात आला ( दिनांक २२/१०/२०२१ )

६ परंतु अर्जदाराकडून १०/०३/२०२२ पर्यंत काहीच उत्तर आले नाही .त्यामुळे ११/०३/२०२२ रोजी त्याच व्हाट्सअॅप वर असे कळवण्यात आले कि जर त्यांनी २१/०३/२०२२ रोजी आपली बाजू मांडण्यासाठी समिती समोर उपस्थित राहावे अन्यथा त्यांना काहीही म्हणायचे नाही असे समजून समिती आपला अहवाल सादर करेल

७ त्यानंतर अर्जदाराचे उत्तर आले कि त्या सध्या बंगलोर येथे राहत असल्यामुळे व त्याना सुटी मिळणे शक्य नसल्यामुळे ,तसेच रेल्वे चे आरक्षण उपलब्ध नसल्यामुळे ,त्या ११/०४/२०२२ रोजी समिती समोर हजार राहतील व आवश्यक ते पुरावे सादर करतील

त्यानुसार अर्जदार कुमारी नताशा रामटेके दिनांक11/04/22 रोजी आपली बाजू मांडण्यासाठी समिती समोर उपस्थित राहिल्या . या मध्ये सगळ्या मुद्द्यांवर चर्चा झाली. समितीने नताशा हिला या case संबंधित अजून काही पुरावे असतील तर ते सादर करावे असे सांगितले होते परंतु दिनांक 22 जुलै २०२३ पर्यंत काही अजून पुरावे उपलभ ना केल्यामुळे व समिती हा अहवाल सादर करीत आहे.

१) अर्जदाराने सादर केलेल्या पत्रांतील मुद्दा क्रमांक ३ [ सहपत्र क्रमांक १ मधील तक्ता क्रमांक १ व २ ] नुसार अर्जदाराने तिला मिळालेल्या M Sc SEM IV (CBCS) summer 2017 मध्ये तिला प्रात्यक्षिक परीक्षेत मिळालेल्या गुणांची तुलना तिच्या बरोबर असलेल्या अनुत्तीर्ण व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसोबत केली आहे .व सादर केलेल्या सहपत्र वरून असे दिसते कि तिला प्रात्यक्षिक परीक्षेत मिळालेले गुण (८५) हे इतर सगळ्यानपेक्षा कमी आहेत. अर्जदाराचे हे म्हणणे बरोबर आहे

2) अर्जदाराने सादर केलेल्या पत्रांतील मुद्दा क्रमांक ४ नुसार [ सहपत्र क्रमांक २] अर्जदाराने तिला theory परीक्षेत मिळालेल्या गुणांची तुलना तिच्या बरोबर असलेल्या अनुत्तीर्ण व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसोबत केली आहे व सादर केलेल्या सहपत्र वरून असे दिसते कि तिला SPP

Scanned with OKEN Scanner

या विषयात परीक्षेत मिळालेले गुण हे ४८) हे या विषयामध्ये अनुत्तीर्ण व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपेक्षा सगळ्यात जास्त आहे . अर्जदाराचे हे म्हणणे बरोबर आहे.

परंतु वरील दोन्ही मुद्दे एकत्र करून बघितले असता ,समितीला असे वाटते कि भौतिक शास्त्र या विषयामध्ये practical skill व theory यांचा सरळ संबंध लावता येत नाही. तसेच प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण हे नियमानुसार बाह्य परीक्षक देत असतात .परंतु डॉक्टर विजया सांगावार या त्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी बाह्य परीक्षक नसल्यामुळे अर्जदाराचा आरोप सिद्ध होत नाही

3 अर्जदाराने सादर केलेल्या पत्रांतील मुद्दा क्रमांक ६ - कुमारी नताशा रामटेके हि नियमित विद्यार्थिनी असताना तिला अंतर्गत मूल्यांकनामध्ये अनुपस्थित दाखवणे चुकीचे आहे .म्हणूनच मा उच्च न्यायालयाच्या आदेशाने शासकीय विज्ञान संस्थेच्या प्रशासनाला अंतर्गत मूल्यांकनाच्या (२०) गुणांसाठी परीक्षा घेण्यास सांगितले .

नताशाने घेतलेला Foundation course – Banking Operations and services हा पेपर शासकीय विज्ञान संस्थे मध्ये नसून विद्यापीठाच्या नियमानुसार नताशा हिने घेतला होता .त्याकरिता डॉक्टर विजया सांगावार, यांनी तासिका तत्वावर शिक्षकाची नेमणूक केलेली होती. याच शिक्षकाने अंतर्गत मूल्यांकना बरोबर केले किंवा नाही हे तपासून पाहणे विभागप्रमुख म्हणून डॉक्टर विजया सांगावार यांची जवाबदारी होती .परंतु तसे न करता त्यांनी नताशा हिची अनुपस्थिती दाखवून तिच्यावर अन्याय केलेला आहे असे समितीला वाटते

4 मुद्दा क्रमांक ७ प्रमाणे मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कु नताशाचे अंतर्गत मूल्यांकनाकरिता परीक्षा घेण्यासाठी संचालक,शासकीय विज्ञान संस्था नागपूर यांनी डॉक्टर सी पी चौधरी सहायक प्राध्यापक, **पदार्थ विज्ञान** यांना सांगितले

संचालकांच्या आदेशानुसार कुमारी नताशा रामटेके हिची परीक्षा घेऊन डॉक्टर सी पी चौधरी यांनी,उत्तरपत्रिका व गुणपत्रिका सीलबंद लिफाफ्यात विभागप्रमुख डॉक्टर विजया सांगावार,प्राध्यापक पदार्थ विज्ञान यांच्याकडे जमा केल्याचे सांगितले .त्यामुळे दिलेल्या गुणांविषयी कोणताही पुरावा ते सादर करू शकत नाहीत

Scanned with OKEN Scanner

# निष्कर्ष

वरील सर्व मुद्द्यांवरून असे दिसते कि नताशा हिच्या पत्रांतील मुद्दा क्रमांक ६ मध्ये नताशा हिच्यावर अन्याय झाल्याचा कागदोपत्री पुरावा उपलब्ध आहे परंतु मुद्दा क्रमांक ३,४,व ७ मध्ये पुरावा उपलब्ध नसल्यामुळे नताशा हिने केलेले आरोप सिद्ध होत नाहीत

सोबत जोडलेली सहपत्रे

१ कुमारी नताशा रामटेके हिने राज्यपालांना लिहिलेल्या पत्राची प्रत

२ संचालक,शासकीय विज्ञान संस्था नागपूर याना उच्च शिक्षण संचालनालय ,पुणे -०१ यांचेकडून प्राप्त झालेलया पत्राची प्रत

3 डॉक्टर अंजली रहाटगावकर ,संचालक,शासकीय विज्ञान संस्था नागपूर यांनी डॉक्टर विजया सांगावार , प्राध्यापक ,शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञानसंस्था अमरावती यांना पाठवलेल्या पत्राची प्रत

4 डॉक्टर अंजली रहाटगावकर ,संचालक,शासकीय विज्ञान संस्था नागपूर यांनी डॉक्टर विजया सांगावार , प्राध्यापक ,शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञानसंस्था अमरावती यांना पाठवलेल्या स्मरणपत्राची प्रत

5 डॉक्टर विजया सांगावार , प्राध्यापक ,शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञानसंस्था अमरावती यांचेकडून डॉक्टर अंजली रहाटगावकर ,संचालक,शासकीय विज्ञान संस्था नागपूर याना प्राप्त झालेलया पत्राची प्रत

6 कुमारी नताशा रामटेके यांच्याकडून तक्रार निवारण समितीला ,त्यांची बाजू मांडण्याबाबत प्राप्त झालेलया पत्राची प्रत

7 कुमारी नताशा रामटेके हिने चौकशी समिती समोर दिलेल्या साक्षी च्या वेळी सादर केलेले सगळे पुरावे

ज्यात खालील सहपत्रे आहेत

७a अर्जदाराने तिला मिळालेल्या M Sc Physics SEM IV (CBCS) summer 2017 मध्ये प्रात्यक्षिक परीक्षेत मिळालेल्या गुणांची तुलना तिच्या बरोबर असलेल्या अनुत्तीर्ण व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसोबत केली आहे त्याचा पुरावा

७b अर्जदाराने तिला theory परीक्षेत मिळालेल्या गुणांची तुलना तिच्या बरोबर असलेल्या अनुत्तीर्ण व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसोबत केली आहे त्याचा पुरावा

Scanned with OKEN Scanner

७c कुमारी नताशा रामटेके हि नियमित विद्यार्थिनी असताना तिला अंतर्गत मूल्यांकनामध्ये अनुपस्थित दाखवले ती नापास मार्कलिस्ट.

7d कुमारी नताशा रामटेके हिचा M Sc Physics SEM IV (CBCS) summer 2017 मध्ये pass दाखवले आहे ती मार्कलिस्ट

७e अर्जदाराला Foundation course – Banking Operations and services या विषयात मिळालेल्या इंटर्नल मार्क्स ची इतर विद्यार्थ्यांना मिळालेल्या चौथ्या विषयातील इंटर्नल मार्क्ससोबत तुलना

पुढील कारवाईसाठी कार्यालयास सादर .

| | | |
|---|---|---|
| डॉक्टर संध्या धाबे | अध्यक्ष तक्रार निवारण समिती | [signature] 07.08.23 |
| डॉक्टर सी पी चौधरी | सदस्य | [signature] |
| डॉक्टर माधवी मार्डीकर | सदस्य | [signature] |
| डॉक्टर जनबंधू | सदस्य | [signature] |
| डॉक्टर स्वाती देशमुख | सदस्य | [signature] |

Scanned with OKEN Scanner